क्रमांक : मुंमप्रविप्रा/बैठक/७०

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
वांद्रे-कुर्ला समूह, "इ" ब्लॉक,
प्लॉट क्र. सी-१४ व १५, वांद्रे [पूर्व],
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : १० सप्टेंबर, १९९३.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २४ ऑगस्ट, १९९३ रोजी झालेल्या ७० व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठविली आहे.

२. सन्माननीय सदस्यांनी या बाबतीत काही हरकती असल्यास त्या कृपया कळवाव्यात ही विनंती.

[श्र. वि. आसगांवकर]
सचिव,
कार्यकारी समिती

प्रति,
सर्व सदस्य

निमंत्रित :
शासनाचे सचिव [२]
नगर विकास विभाग
मंत्रालय

प्रत अग्रेषित :
विधी सल्लागार, मुं. म. प्र. वि. प्रा.

प्राधिकरणाचे अधिकारी

206

No.BMRDA/MTG/70.

BOMBAY METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY,
Plot Nos.C-14 & C-15,
Bandra-Kurla Complex,
Bandra(East), Bombay-400 051.

Date : 10th September, 1993.

The minutes of the 70th meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on the 24th August, 1993 are enclosed.

Members are requested kindly to intimate their objections, if any.

S.V.Asgaonkar 10/9/93.

(S. V. ASGAONKAR)
SECRETARY
EXECUTIVE COMMITTEE.

To:

All Members.

INVITEE :

The Secretary (II) to the Government of Maharashtra, Urban Development Department, Mantralaya.

Copy to :-

The Legal Adviser, B.M.R.D.A.

The Officers of the B.M.R.D.A.

-.-.-.-.-.-.-.-

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
७०व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २४ ऑगस्ट, १९९३ [मंगळवार] |
| वेळ | : | सकाळी ११-०० वाजता |
| सभास्थान | : | मा. नगर विकास मंत्री यांचे दालन, चौथा मजला, मंत्रालय. |

उपस्थित सदस्य :

| | | |
|---|---|---|
| श्री. अरुणलाल गुजराथी<br>नगर विकास मंत्री | - | अध्यक्ष |
| श्री. अशोक चव्हाण<br>नगर विकास राज्यमंत्री | - | सदस्य |
| श्री. रा. रा. सिंह,<br>मुंबईचे महापौर | - | सदस्य |
| श्री. श. गं. काळे,<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री. डी. टी. जोसेफ,<br>शासनाचे सचिव [१],<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| श्री. नवीन कुमार,<br>शासनाचे सचिव,<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | - | सदस्य |
| श्री. आर. सी. सिन्हा,<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको | - | सदस्य |
| श्री. देवव्रत मेहता,<br>महानगर आयुक्त. | - | सदस्य-सचिव |

गणपूर्ती न होऊ शकल्याने [२ अशासकीय सदस्यांची उपस्थिती नसल्यामुळे] बैठक स्थगित झाली. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या [बैठकीचे कामकाज] विनियम, १९७५ मधील नियम १२ खालील तरतुदीनुसार, अर्ध्या तासानंतर सभा घेण्याचे ठरले.

-----

209

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या तहकूब ७०व्या बैठकीचे कार्यवृत्त

दिनांक : २४ ऑगस्ट, १९९३ [मंगळवार]

वेळ : सकाळी ११-३० वाजता

सभास्थान : मा. नगर विकास मंत्री यांचे दालन, चौथा मजला, मंत्रालय.

उपस्थित सदस्य :

| | | |
|---|---|---|
| श्री. अरुणलाल गुजराथी, नगर विकास मंत्री | – | अध्यक्ष |
| श्री. अशोक चव्हाण, नगर विकास राज्यमंत्री | – | सदस्य |
| श्री. रा. रा. सिंह, मुंबईचे महापौर | – | सदस्य |
| श्री. श. गं. काळे, महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका | – | सदस्य |
| श्री. डी. टी. जोसेफ शासनाचे सचिव [१], नगर विकास विभाग | – | सदस्य |
| श्री. नवीन कुमार, शासनाचे सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | – | सदस्य |
| श्री. आर. सी. सिन्हा, व्यवस्थापकीय संचालक सिडको | – | सदस्य |
| श्री. देवव्रत मेहता, महानगर आयुक्त | – | सदस्य-सचिव |

सभेच्या सुरुवातीला प्राधिकरणाने आमदार व प्राधिकरणाचे माजी सदस्य श्री. प्रेमकुमार शर्मा यांच्या दुःखद निधनाबद्दल दुखवटा व्यक्त केला, त्यानंतर श्री. शर्मा यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त करणारा ठराव [जोडपत्र-एक] संमत करून एक मिनिट शांतता पाळली.

त्यानंतर अध्यक्षांनी, प्राधिकरणाचे नवे महानगर आयुक्त व सदस्य-सचिव म्हणून श्री. देवव्रत मेहता यांचे स्वागत केले.

[कृ. मा. प.]

त्यानंतरचे मावळते महानगर आयुक्त श्री. पी. सुब्रह्मण्यम यांनी केलेल्या सेवेची गौरवपूर्ण नोंद घेणारा ठराव [जोडपत्र-दोन] संमत करण्यात आला.

त्यानंतर विषयपत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

बाब क्र. १ : प्राधिकरणाच्या मागील [६६ व्या] बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे.

कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

बाब क्र. २ : प्राधिकरणाच्या मागील [६९ व्या] बैठकीच्या कार्यवृत्तावर केलेली कार्यवाही.

प्राधिकरणाने कार्यवृत्तावरील कार्यवाहीची नोंद घेतली.

बाब क्र. ३ : सिटीनेटचे सदस्यत्व

प्राधिकरणाने बाब टिप्पणीतील प्रस्ताव संमत करून पुढील ठराव मंजूर केला.

ठराव क्र. ५७१ :

" असा ठराव करण्यात येतो की, प्राधिकरण याद्वारे सिटीनेटच्या सहयोगी सदस्यत्वासाठी अर्ज करण्याचा आणि त्याची वार्षिक सदस्यत्व फी म्हणून १९९१ अमेरिकी डॉलर्स [किंवा सिटीनेट निर्धारीत करील अशी अन्य रक्कम] खर्च करण्याचा प्रस्ताव मान्य करीत आहे.

" आणखी असा ठराव करण्यात येतो की, प्राधिकरणाच्या अध्यक्षाचा प्रतिनिधी म्हणून महानगर आयुक्त यांना आणि सिटीनेट संबंधीच्या बाबी हाताळण्यासाठी संपर्क व्यक्ती म्हणून प्रमुख, नियोजन विभाग यांना नियुक्त करण्याबाबत प्राधिकरणाच्या अध्यक्षांना विनंती करण्यात यावी. "

बाब क्र. : ४ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे पुरस्कृत महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्था - संस्थेच्या नियमात दुरूस्त्या

चर्चेनंतर, संस्थेच्या नियम ९ च्या पोटनियम [नऊ] व [दहा] मध्ये फक्त दुरूस्ती करण्यासंबंधीचा प्रस्ताव प्राधिकरणाने मान्य करून पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्र. ५७२ :

" असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेच्या नियम ४२ अन्वये निहीत अधिकारांचा वापर करून प्राधिकरण याद्वारे,

.. ३/-

बाब टिप्पणीस जोडलेल्या जोडपत्राच्या स्तंभ २ मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे उक्त संस्थेच्या नियम ९ च्या पोटनियम [नऊ] व [दहा] यामध्ये दुरुस्ती करण्यास आणि संस्था निबंधकांची [धर्मादाय आयुक्त, मुंबई] त्यास मान्यता मिळवण्यासाठी महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देत आहे.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, नियम ३३ मध्ये प्रस्तावित दुरुस्ती करण्यासंबंधीच्या प्रश्नावर विचार करणे सध्या स्थगित ठेवण्यात यावे."

बाब क्र. ५ : महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेच्या संचालकाचे वेतनमान, सेवाप्रवेश अर्हता इत्यादी आणि नेमणूक

प्राधिकरणाने बाब टिप्पणीतील प्रस्ताव संमत करून पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्र. ५७३ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेच्या नियम ३३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून प्राधिकरण याद्वारे, संचालक महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्था या पदासाठी पुढीलप्रमाणे वेतनमान व सेवाप्रवेश अर्हता इत्यादी विहीत करीत आहे :-

वेतनमान : रु.४२००-१५०-४८००-द.रो.-१७५-६२००

काम : पदधारक हा मुख्य कार्यकारी अधिकारी असेल आणि तो रचना विकास कर्मचारीवर्ग विषयक धोरणे, मानव संसाधन विकासाचे सर्व पैलू आणि संरक्षण कार्य यावर अधिक भर देऊन उद्यान कार्याचा संपूर्ण टप्पा पार पाडण्यास जबाबदार राहील. या पदासाठी प्रकल्पांची आखणी व अंमलबजावणी करण्याची आणि विधायक कार्य संस्कृती जोपासण्याची आणि लोकांमध्ये निसर्ग संरक्षणासंबंधीची जाणीव वाढविण्याची दृष्टी, नेतृत्व आणि व्यावसायिक क्षमता आवश्यक आहे.

अर्हता : सृष्टी/जीव विज्ञान विषयातील पदव्युत्तर पदवीस अधिक पसंती.

अनुभव : संबंधित क्षेत्रात कमीत कमी ५ वर्षे

वय : ४० ते ४५ वर्षाच्या दरम्यान.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, उपरोक्त नियम ३३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून प्राधिकरण याद्वारे, प्रस्तावित केल्याप्रमाणे पर्यावरण शिक्षण केंद्र, अहमदाबाद येथील अधिकारी श्री. रमेश उत्तम यांची संचालक, महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्था, म्हणून प्रतिनियुक्तीने ३ वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीच्या नेहमीच्या अटी व शर्तीवर नेमणूक करीत आहे.

[कृ. मा. प.]

"असाही ठराव करण्यात येत आहे की, वरील परिच्छेद २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे श्री. रमेश उत्तम यांची सेवा मिळवण्यासाठी महानगर आयुक्त यांना, अहमदाबाद येथील पर्यावरण शिक्षण केंद्रास विनंती करण्यास याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र. ६ : जी. डी. सोमाणी उच्च माध्यमिक शाळेमागील अनधिकृतरित्या झालेला भराव

६.१ या बाबीवरील चर्चेमध्ये पुढील मुद्दे उपस्थित करण्यात आले.

६.१.१ बाब टिप्पणीमध्ये नमूद केल्याप्रमाणे, जी. डी. सोमाणी हायस्कूल मागील ढिगारा अनधिकृतपणे भरण्याचे काम संपूर्णपणे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात आले नाही असे सांगण्यात आले. शिवाय, जमीन पुन:प्रापित करण्याच्या दृष्टीने हा ढिगारा खाली टाकण्यात आला असे दिसत नाही. म्हणून परिस्थितीची फेरपडताळणी करण्याबद्दल आणि वस्तुस्थिती काय आहे ते मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास कळविण्याबद्दल मुंबईच्या जिल्हाधिकाऱ्यांना विनंती करावी असे मत व्यक्त करण्यात आले.

६.१.२ अशीही सूचना करण्यात आली की, जरी ढिगारा भरणे अनधिकृत असले तरी वस्तुस्थिती मान्य करणे आवश्यक असून पुन:प्रापित जमिनीचा इतर प्रयोजनासाठी वापर करण्यात यावा. अन्यथा त्या जमिनीवर अतिक्रमण होण्याचा संभव आहे. या जमिनीला कुंपण घालावे आणि ही सरकारी जमीन आहे असे दर्शविणारा फलक तेथे लावावा अशीही सूचना करण्यात आली. आणखी असे सुचवण्यात आले की, [१] संदर्भाधीन जमीन माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांचा पुतळा उभारण्यासाठी पर्यायी जागा म्हणून वापरणे, [२] हेलिपॅडची व्यवस्था करणे, किंवा [३] उक्त जमीन बगीचा म्हणून विकसित करणे, या ३ सूचनांचा विचार करावा.

६.१.३ आणखी अशी सूचना करण्यात आली की, विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने, उक्त जमीन प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्याबाबत शासनास विनंती करावी आणि सदर हस्तांतरणाच्या अपेक्षेने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने उक्त जमिनीस कुंपण घालून तेथे पहारा ठेवावा.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विधी सल्लागारांनी असे सांगितले की, जमीन प्राधिकरणाकडे प्रत्यक्षात हस्तांतरीत झाल्याशिवाय जमिनीला कुंपण घालता येणार नाही किंवा तेथे पहारा ठेवता येणार नाही.

....५/-

त्यानंतर असे सूचवण्यात आले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व नगर विकास विभाग यांनी मुंबईच्या जिल्हाधिका-यांना, आवश्यक त्या औपचारीक बाबी पूर्ण करून शक्य तितक्या लवकर जमीन प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्या-बद्दल विनंती करावी म्हणजे त्या जमिनीवर अतिक्रमण होणार नाही.

६.२ तथापि या विषयावर आणखी चर्चा झाल्यानंतर, सचिव, नगर विकास विभाग यांना मंत्रीमंडळाच्या विचारासाठी सविस्तर टिप्पणी तयार करून संदर्भाधीन जमिनीबाबत कार्यवाही करण्यासंबंधी मंत्रीमंडळाचे आदेश मागण्याची विनंती करण्यात आली.

बाब क्र.७ : प्राधिकरणाने मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समितीस मंजूर केलेल्या रू.४ कोटी कर्जाच्या काही अटी व शर्तींमध्ये शासनाने केलेल्या फेरबदलाची नोंद घेणे.

शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.बीएमआरडीए/१०९१/२७२४/सीआर-३२/यूडी-१० दिनांक २४-५-१९९३ याद्वारे शासनाने मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समितीस रू. १ कोटीचे कर्ज [प्राधिकरणाने आधी मंजूर केलेल्या रू.४ कोटीपैकी] देणे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून ते वितरीत करण्याची पध्दती, मुंबई महानगर प्रदेश लोखंड व बाजार समितीने करावयाची परतफेडीची व्यवस्था इत्यादी बाबीस मंजूरी दिली, याची प्राधिकरणाने नोंद घेतली.

त्यानंतर बाब क्र.८ ते १० यावर एकत्रितपणे विचार करण्यात आला:-

बाब क्र.८ : वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जीएन" ब्लॉकमधील ६ निवासी भूखंड शासकीय विभाग, सार्वजनिक क्षेत्र उपक्रम इत्यादींना नेमून देणे.

बाब क्र.९ : वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील सुमारे ६६९६ चौ.मीटरचा वाणिज्यिक भूखंड क्र.सी-१९ भारतीय स्टेट बँकेस नेमून देणे.

बाब क्र.१०: वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील १४००० चौ.मीटरचा वाणिज्यिक भूखंड भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडला नेमून देणे - देकार आस्थगित ठेवणे.

या बाबींच्या संबंधात अध्यक्षांनी असे मत व्यक्त केले की, वांद्रे-कुर्ला संकुलातील जमिनीसाठीची स्पर्धात्मक मागणी विचारात घेता, उपलब्ध जमिनीचा वापर वित्तीय केंद्र किंवा वित्तीय-नि-वाणिज्यिक केंद्र म्हणून करावयाचा किंवा कसे याविषयी निर्णय घेणे सध्याच्या स्थितीत आवश्यक आहे आणि उक्त निर्णयाच्या आधारे त्या जमिनीवर कोणत्या प्रकारच्या वित्तीय/वाणिज्यिक संघटना/संस्था,

....६/-

व्यापारी कामे इ. यांना मुभा द्यावयाची हे ठरवणे आवश्यक आहे. अध्यक्षांनी पुढे असे सुचवले की, वांद्रे-कुर्ला संकुलातील उरलेल्या जमिनीबाबत वाणिज्यिक वापर व निवासी वापर यांची टक्केवारी बदलण्याच्या इष्टतेचाही विचार करावा लागेल. वाणिज्यिक घटक वाढावा म्हणून निवासी घटक कमी केल्यास, नजीकच्या "ना विकास झोन" मधील जमीन, निवासी वापरासाठी रूपांतरीत करता येईल. रोरो सेवा किंवा तत्सम सुविधा सुरु करण्याचा देखील विचार करण्यात यावा असेही सुचवण्यात आले.

तदनुसार, बाब क्र.८ व ९ वरील विचार लांबणीवर टाकण्यात आला आणि बाब क्र.१० मध्ये सुचवल्याप्रमाणे भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशनला जमीन नेमून देण्यास स्थगिती देण्याची सूचना मान्य करण्यात आली.

<u>बाब क्र.११</u> : वडाळा ट्रक टर्मिनलचा टप्पा-२ - मुंबई माल वाहतूक संस्था व महाराष्ट्र ट्रक टेम्पो बस वाहतूक संघ यांना प्रत्येकी ५० टक्के भूखंड नेमून देण्याचे आश्वासन देणे.

या बाबीच्या संबंधात असे सुचविण्यात आले की, महाराष्ट्र ट्रक टेम्पो बस वाहतूक संघ [महासंघ] आणि मुंबई माल वाहतूक संस्था यांचे सदस्य, बृहन्मुंबईतील माल वाहतुकीत प्रत्येक संस्थेचा कार्यभाग, बेट शहरात निरनिराळ्या ठिकाणी या संस्थांच्या सदस्यांच्या सध्या ताब्यात असलेली जागा, वडाळा ट्रक टर्मिनलचे काम सुरु झाल्यानंतर सध्या त्यांच्याकडे असलेल्या जागेच्या वापरासंबंधातील त्यांचा इरादा इत्यादी तपशिलाची त्यांच्याकडून माहिती घेतल्यानंतर तो तपशील प्राधिकरणापुढे ठेवण्यात यावा.

तदनुसार या बाबीवर विचार करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

<u>बाब क्र.१२</u> : सामाजिक परिवर्तन अभ्यास केंद्राने [ESSC ] द्यावयाच्या मार्गीकरण आकाराच्या उर्वरीत रकमेवरील व्याज सोडून देणे.

या बाबीवरील चर्चेच्या ओघात, सामाजिक परिवर्तन अभ्यास केंद्राने गरिबांसाठी केलेल्या चांगल्या कामाचा गौरव करण्यात आला. प्राधिकरणाने असे मत व्यक्त केले की, सामाजिक परिवर्तन अभ्यास केंद्रासारख्या ज्या इतर संस्थांना वांद्रे-कुर्ला संकुलातील जमीन नेमून देण्यात आली आहे. त्यांना सुध्दा कमी केलेला मार्गीकरण आकार हप्तेबंदीने भरण्याची सुविधा देण्यात यावी. तसेच व्याज आकार सोडून देण्यात यावा. तदनुसार प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.५७४</u> :

"असा ठराव करण्यात येतो की, प्रस्तावित केल्याप्रमाणे वांद्रे-कुर्ला

215



संकुलाच्या "एफ" ब्लॉकमध्ये सामाजिक परिवर्तन अभ्यास केंद्रास शासनाने नेमून दिलेल्या १०६७० चौ. मीटर भूखंडाच्या बाबतीत, उक्त केंद्राने प्राधिकरणास मार्गीकरण आकाराच्या उरलेल्या रकमेवरील दरसाल १२½ टक्के दराने द्यावयाचे व्याज सोडून देण्यास प्राधिकरण याद्वारे मंजूरी देत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, गरीब, अपंग इत्यादी लोकांच्या कल्याणाचे काम करणा-या ज्या संस्थांना वांद्रे-कुर्ला संकुलात जमीन नेमून देण्यात आलेली आहे. त्यांना कमी केलेला मार्गीकरण आकार हप्तेबंदीने भरण्याची सुविधा देण्यास आणि विलंबित प्रदानाबद्दल अशा संस्थांनी द्यावयाचे व्याज सोडून देण्यास प्राधिकरण सर्वसाधारण मंजूरी देत आहे. आणि प्राधिकरणाने दिलेल्या या सर्वसाधारण मंजूरीप्रमाणे यापुढे अशा प्रकरणांत कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र. १३ : प्राधिकरणाचे १९९२-९३ चे लेखे व त्यावरील अहवाल

या बाबीच्या संबंधात सचिव [१], नगर विकास विभाग यांनी बैठकीस असे सांगितले की, महालेखापाल, महाराष्ट्र जे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे विधिसंस्थापित लेखापरीक्षक आहेत. त्यांनी वांद्रे-कुर्ला संकुलातील सरकारी जमिनी प्राधिकरणाकडे हस्तांतरीत केल्यामुळे, या जमिनीच्या विल्हेवाटीद्वारा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला मिळालेली अतिरिक्त रक्कम शासनाला परत करावी असे मत व्यक्त केले होते. संदर्भाधीन सरकारी जमिनी पुन:प्रापित नव्हत्या आणि विहीत अधिमूल्य शासनास प्रदान केल्यावर त्या जमिनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यात आल्या. आणि अशा हस्तांतरणाच्या अटी व शर्तीप्रमाणे विकसित भूखंडांच्या विक्री किंवा पुनर्विक्रीमुळे झालेला नफा किंवा तोटा ही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची जबाबदारी राहील असे स्पष्ट करण्यात आले होते. वरील परिस्थिती स्पष्ट करणारे पत्र यापूर्वीच शासनास पाठविण्यात आल्याचे सांगण्यात आले.

त्यानंतर प्राधिकरणाने वार्षिक लेखे आणि त्यावरील मुख्य लेखा अधिकारी व वित्तीय सल्लागार यांचा अहवाल मान्य केला आणि पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्र. ५७५ :

"असा ठराव करण्यात येतो की, प्राधिकरणाचे १९९२-९३ या वर्षाचे लेखे आणि त्यावरील मुख्य लेखा अधिकारी व वित्तीय सल्लागार यांचा अहवाल यांस प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे."

बाब क्र. १४ : कल्याण संकुल अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा १९९२-९३ या वर्षाचा वार्षिक अहवाल.

प्राधिकरणाने प्रारूप वार्षिक अहवाल संमत करून पुढील ठराव मंजूर केला.

ठराव क्र. ५७६ :

"असा ठराव करण्यात येतो की, प्राधिकरण याद्वारे [एक] १९९२-९३ या वर्षासाठी कल्याण संकुल अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तयार केलेल्या प्रारूप अहवालाला मान्यता देत आहे. आणि [दोन] तो राज्य शासनाला सादर करण्यासाठी महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

बाब क्र. १६ : वांद्रे-कुर्ला समूह अधिसूचित क्षेत्राकरिता विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा १९९२-९३ चा वार्षिक अहवाल

या बाबीवरील चर्चेच्या दरम्यान, वांद्रे-कुर्ला संकुल विकसित करण्याच्या एका उद्दीष्टाचा उल्लेख करण्यात आला. हे उद्दीष्ट म्हणजे शक्य असेल त्याप्रमाणे दक्षिण मुंबईतून बहुसंख्य कार्यालये वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये आणून विकास पध्दतीची पुनर्रचना करण्याच्या संधीचा उपयोग करून घेणे हे होय. वांद्रे-कुर्ला संकुलात कार्यालयासाठी जागा उपलब्ध करून देऊन शहरातील संभाव्य दाटी दूर करण्यात आलेली असली तरी त्यामुळे दक्षिण मुंबईकडील विद्यमान कार्यालये वांद्रे-कुर्ला संकुलात आवश्यकतेनुसार पुन:स्थापित करता आली नाहीत. हे मान्य करण्यात आले. आणखी असे सांगण्यात आले की, दक्षिण मुंबईतून वांद्रे-कुर्ला संकुलाकडे काही कार्यालये आकर्षित करण्याचे उद्दीष्ट साध्य करण्यासाठी कल्पक उपाय योजण्याचा विचार करण्यात यावा आणि यापुढे जमिनी नेमून देण्याच्या वेळी हे उपाय कार्यान्वित करावेत.

त्यानंतर प्राधिकरणाने वार्षिक अहवालाचा मसूदा मान्य केला आणि पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ५७७ :

"असा ठराव करण्यात येतो की, प्राधिकरण याद्वारे [१] वांद्रे-कुर्ला संकुल अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर

....९/-

प्रदेश विकास प्राधिकरणाची १९९२-९३ या वर्षाचा वार्षिक अहवाल महाराष्ट्र प्रदेश व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १३३ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे मान्य करीत आहे आणि [२] हा अहवाल राज्य शासनास सादर करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे."

बाब क्र. १६ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा ओशिवरे जिल्हा केंद्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून १९९२-९३ चा वार्षिक अहवाल

प्राधिकरणाने प्रारूप वार्षिक अहवाल संमत करून पुढील ठराव मंजूर केला:

ठराव क्रमांक ५७८ :

"असा ठराव करण्यात येतो की, प्राधिकरण याद्वारे [१] ओशिवरे जिल्हा केंद्राकरिता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तयार केलेल्या १९९२-९३ च्या प्रारूप अहवालास मंजूरी देत आहे. [२] हा अहवाल राज्य शासनाकडे सादर करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

बाब क्र. १७ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून बॅकबे पुन:प्रापण योजनेचा [ब्लॉक तीन ते सहा] १९९२-९३ चा वार्षिक अहवाल.

प्राधिकरणाने प्रारूप वार्षिक अहवाल संमत करून पुढील ठराव मंजूर केला.

ठराव क्र. ५७९ :

"असा ठराव करण्यात येतो की, प्राधिकरण याद्वारे [१] बॅकबे पुन:प्रापण योजनेतील ब्लॉक तीन ते सहा करिता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केलेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा १९९२-९३ सालाच्या प्रारूप वार्षिक अहवालास मान्यता देत आहे. [२] हा अहवाल राज्य शासनाला सादर करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

त्यानंतर अध्यक्षांच्या परवानगीने पुढील बाबीवर पटल बाब [Table Item] म्हणून विचार करण्यात आला.

पटल बाब : वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "एच" ब्लॉकमधील वाणिज्यिक झोन-मधील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विद्यमान शाळेचा प्रस्तावित पुनर्विकास

चर्चेनंतर, संदर्भाधीन भूखंडाचा वापर शाळेसाठी करण्यात यावा म्हणून महाराष्ट्र प्रदेश व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदीनुसार वांद्रे-कुर्ला संकुलाच्या

...ूर नियोजन प्रस्तावांमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विनंतीप्रमाणे गौण फेरबदल करावेत असे प्राधिकरणास वाटले. तदनुसार प्राधिकरणाने पुढील ठराव ...ूर केला.

...राव क्र. ५८० :

"असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र प्रदेश नगर रचना अधिनियम ...६६ च्या कलम ४०[१][क] अन्वये प्राधिकरणास वांद्रे-कुर्ला संकुल अधिसूचित क्षेत्रा-...चे विशेष नियोजन प्राधिकरण नेमण्यात आल्यामुळे प्राधिकरण उक्त अधिनियमाच्या ... ४०[३] आणि कलम ११३ [ए] [८] यासह उक्त अधिनियमाच्या कलम ३७ ...ील अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व ...कारांचा वापर करून, वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "एच" ब्लॉकमध्ये शीव-धारावी ...च्या बाजूने १०० मिटर रूंदीच्या पट्टयात येणा-या ज्या भूखंडावर, ...मुंबई महानगरपालिकेची सध्या शाळा आहे त्या भूखंडाचे "वाणिज्यिक" ऐवजी "...ची इमारत" असे आरक्षण बदलता यावे म्हणून वांद्रे-कुर्ला संकुलाच्या मंजूर ...नियोजन प्रस्तावात फेरबदल करण्यास मान्यता देत आहे.

"पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की प्राधिकरण उक्त अधिनियमाचे ...लम ३७ अंतर्गत असलेले अधिकार आणि इतर सहाय्यभूत शक्तींचा वापर करून फेरबदलासंबंधात शासकीय राजपत्रात आणि "टाईम्स व इंडिया" [इंग्रजी] व लोकसत्ता [मराठी] या दोन स्थानिक वृत्तपत्रातून जनतेच्या हरकती व सूचना १ महिन्याहून जास्त नाही इतक्या अवधीत मागविणारी नोटीस प्रसिध्द करण्यात मान्यता देत आहे.

"पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरण उक्त अधिनियमाचे कलम १३९ अंतर्गत आपले अधिकार व १९७४ चा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधि-...रणाच्या कलम ७[अ] खालील अधिकार वापरून वरील परिच्छेदानुसार नोटीस ...सिध्द करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

"पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरण उक्त अधिनियमाचे ...म १५१[३] अंतर्गत आपले अधिकार वापरून महानगर आयुक्तांस असा निर्देश देत ...हे की, महानगर आयुक्त अथवा त्यांनी नेमलेल्या निदान वरिष्ठ नियोजकाच्या दर्जाचा अधिकारी अशा हरकती/सूचना सादर करणा-या व्यक्तींचे म्हणणे ऐकून अशा ...रकती सूचनांवर विचार करील व उक्त अधिनियमाचे कलम ३७ अन्वये प्रस्तावित फेरबदलासह आपला अहवाल अंतिम मंजूरीसाठी राज्य शासनास सादर करील."

त्यानंतर अध्यक्षांचे आभार मानून सभेचे कामकाज समाप्त झाले.

---

जोडपत्र १४२

जोडपत्र - १

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची
तहकूब ७०वी बैठक

दिनांक : २४-८-१९९३

: ठ रा व :

"श्री. प्रेमकुमार शर्मा, विधानसभा सदस्य यांचे दिनांक १ जून, १९९३ रोजी निधन झाले. श्री. शर्मा हे दिनांक १०-४-१९८१ ते ९-४-१९८२ या कालावधीत, मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष या नात्याने प्राधिकरणाचे सदस्य होते. या काळात श्री. शर्मा यांनी प्राधिकरणाच्या कार्यात व कामकाजात आस्थेने भाग घेतला. हे प्राधिकरण, त्यांच्या दुःखद आणि आकस्मिक निधनाने फार मोठी हानी झाल्याचे अभिलिखित करीत आहे."

---

जोडपत्र-२

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची
तहकूब ७०वी बैठक

दिनांक : २४-८-१९९३

: ठ रा व :

"श्री. पी. सुब्रह्मण्यम यांनी या प्राधिकरणाचे सदस्य-सचिव आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त या नात्याने दिनांक १९-७-१९९१ पासून दिनांक २१-७-१९९३ पर्यंत केलेल्या कार्याचा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण गौरवपूर्ण उल्लेख करीत आहे. श्री. सुब्रह्मण्यम यांना त्यांचा भावी सेवा काळ उज्ज्वलशील जावा अशी सदिच्छा हे प्राधिकरण व्यक्त करीत आहे."

-------

## MINUTES OF THE 70TH MEETING OF THE BOMBAY METROPOLITA DEVELOPMENT AUTHORITY

DATE : 24th August, 1993 (Tuesday)

TIME : 11.00 A.M.

PLACE : The Chamber of Minister for Urban Development, 4th Floor, Mantralaya.

MEMBERS PRESENT :

| | |
|---|---|
| Shri Arunlal Gujarathi, Minister for Urban Development. | - Chairman |
| Shri Ashok Chavan, Minister of State for Urban Development. | - Member |
| Shri R.R. Singh, Mayor of Bombay. | - Member |
| Shri S.G. Kale, Municipal Commissioner, Municipal Corporation of Greater Bombay. | - Member |
| Shri D.T. Joseph, Secretary (I) to Government, Urban Development Department. | - Member |
| Shri Navin Kumar, Secretary to Government, Housing & Special Assistance Department. | - Member |
| Shri R.C. Sinha, Managing Director, CIDCO. | - Member |
| Shri D. Mehta, Metropolitan Commissioner. | - Member-Secretary |

As the quorum was not present (2 non-official members) the meeting adjourned. As provided under Rule 12 of the BMRDA (Conduct of Business at Meetings) Regulations, 1975, it was decided to meet after half an hour.

-.-.-.-.-.-

-: 2 :-

## MINUTES OF THE ADJOURNED 70TH MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

DATE : 24th August, 1993 (Tuesday)

TIME : 11.30 A.M.

PLACE : The Chamber of Minister for Urban Development, 4th Floor, Mantralaya.

MEMBERS PRESENT :

| | |
|---|---|
| Shri Arunlal Gujarathi, Minister for Urban Development. | - Chairman |
| Shri Ashok Chavan, Minister of State for Urban Development. | - Member |
| Shri R.R. Singh, Mayor of Bombay. | - Member |
| Shri S.G. Kale, Municipal Commissioner, Municipal Corporation of Greater Bombay. | - Member |
| Shri D.T. Joseph, Secretary (I) to Government, Urban Development Department. | - Member |
| Shri Navin Kumar, Secretary to Government, Housing & Special Assistance Department. | - Member |
| Shri R.C. Sinha, Managing Director, CIDCO. | - Member |
| Shri D. Mehta, Metropolitan Commissioner. | - Member-Secretary. |

At the outset, the Authority condoled the sad demise of Shri Premkumar Sharma, M.L.A. and former Member of the Authority and passed the resolution placing on record its deep sense of loss at the passing away of Shri Premkumar Sharma by observing one minute's silence (Annexure-I).

The Chairman then welcomed Shri D. Mehta, new Metropolitan Commissioner and Member Secretary of the Authority.

A resolution appreciating the services rendered by Shri P. Subrahmanyam, the outgoing Metropolitan Commissioner was thereafter adopted (Annexure-II).

The .....

The Items on the Agenda were then taken up for consideration.

ITEM NO. 1 : Confirmation of the Minutes of the last (69th) Meeting of the Authority.

The Minutes were confirmed.

ITEM NO. 2 : Action taken on the Minutes of the last (69th) Meeting of the Authority.

The action taken report was noted by the Authority.

ITEM NO. 3 : Membership of CITYNET.

The Authority approved the proposal contained in the Item Note and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.571 :

"RESOLVED THAT the Authority do hereby approve the proposal to apply for the associate membership of the CITYNET and incur an expenditure of U.S. $ 1691, (or such other sum as may be determined by the CITYNET) annually, as its membership fees.

"RESOLVED FURTHER THAT the Chairman of the Authority be requested to designate the Metropolitan Commissioner as the Representative of the Chairman of the Authority and the Chief, Planning Division as a contact person for dealing with the matter relating to the CITYNET."

ITEM NO. 4 : Maharashtra Nature Park Society sponsored by BMRDA - Amendments to the Rules of -

After discussion the Authority approved the proposal as regards amendment to sub-Rules (ix) and (x) of Rule 9 of the Society only and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.572 :

"RESOLVED THAT in exercise of the powers vested under Rule 42 of the Rules of the Maharashtra Nature Park Society, the Authority hereby approves that sub-Rules (ix) and (x) of Rule 9 of the Rules of the said Society be amended as proposed in column 2 of the Annexure to the Item Note and the Metropolitan Commissioner be authorised to obtain the approval of the Registrar of Societies (Charity Commissioner, Bombay) thereto.

"RESOLVED ....

"RESOLVED FURTHER THAT consideration of the issue regarding proposed amendment to Rule 33 be deferred for the present."

ITEM NO. 5 : Director - Maharashtra Nature Park Society - Pay Scale, Recruitment Qualifications, etc. and appointment to the -

The Authority approved the proposal contained in the Item Note and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.573 :

"RESOLVED THAT in exercise of the powers conferred under Rule 33 of the Rules of the Maharashtra Nature Park Society, the Authority hereby prescribes pay-scale and recruitment qualifications, etc. for the post of Director, Maharashtra Nature Park Society as follows :-

'PAY SCALE : Rs.4200-150-4800-EB-175-6200.

JOB : The incumbent, who will be the Chief Executive shall be responsible for the entire gamut of the Park's functions with major emphasis on organisation development, personnel policies, all facets of Human Resources Development and conservation action. The position calls for vision, leadership and professional ability to plan and execute projects and foster a positive work culture and enhance awareness about nature conservation among the people.

QUALIFICATIONS : A Master's Degree in Natural/Life Sciences preferable.

AGE : Between 40 and 45 years.'

"RESOLVED FURTHER THAT in exercise of the powers conferred under the above mentioned Rule 33, the Authority also hereby appoints Shri Ramesh Uttam, Officer from the Centre for Environment Education, Ahmedabad as Director, Maharashtra Nature Park Society on deputation for a period of 3 years, on usual terms and conditions of deputation, as proposed."

ITEM NO. 6 : Unauthorised filling of debris behind G.D. Somani High School.

6.1. During the course of discussion on this Item the

following ....

following points were raised :-

6.1.1. It was stated that unauthorised filling of debris behind G.D. Somani High School was not entirely done by the Municipal Corporation of Greater Bombay as stated in the Item Note. Besides the dumping appeared to be not with a view to reclaiming the land. It was, therefore, desired that the Collector of Bombay might be approached to re-verify the position and apprise the BMRDA of the correct position.

6.1.2. It was also suggested that even though the filling was unauthorised, it was necessary to recognise that fact and put the reclaimed land to some use. Otherwise it was likely to be encroached. It was also suggested that the land might be fenced and a board indicating that it is Government land, be exhibited. It was also suggested that 3 suggestions, viz. (i) using the land under reference as an alternative site for erection of a statue of the late Prime Minister Smt. Indira Gandhi; (ii) providing a helipad; or (iii) developing the said land as garden, be considered.

6.1.3. It was also suggested that as the Special Planning Authority, the BMRDA might request the Government to transfer the said land to BMRDA and in anticipation of the said transfer, the BMRDA might fence and guard the said land.

The Legal Adviser, BMRDA stated that unless the land is actually transferred to BMRDA, the BMRDA cannot fence and/or guard the land. It was thereupon suggested that the Collector of Bombay be requested by the BMRDA & UDD to complete the necessary formalities and transfer the land to the BMRDA as early as possible so that it is not encroached.

6.2. After further discussion on this issue the Secretary, Urban Development Department was, however, requested to prepare a comprehensive note for the consideration of the Cabinet and seek their orders as regards steps to be taken in respect of the land under reference.

<u>ITEM NO. 7</u> : Modification by Government of certain terms and conditions of the loan of Rs.4.00 crores granted to the Bombay Metropolitan Region Iron & Steel Market <u>Committee by the BMRDA - Report to</u>

The Authority noted the contents of Government Resolution in Urban Development Department No.BMRDA-1091/2724/CR-32/UD-10, dated 24.5.1993 by which Government had accorded sanction for release of loan of Rs.1.00 crore to the Bombay Metropolitan

Region ....

Region Iron and Steel Market Committee (out of Rs.4.00 crores earlier sanctioned by the Authority), its mode of disbursement by the BMRDA, its repayment arrangements by the BMR Iron & Steel Market Committee, etc.

The following Item Nos.8 to 10 were then taken up for consideration together :-

ITEM NO. 8 : Allotment of 6 Residential Plots in 'GN' Block of the Bandra-Kurla Complex to Government Departments, Public Sector Undertakings, etc.

ITEM NO. 9 : Allotment of Commercial Plot No.C-19 admeasuring about 6696 Sq.Mtrs. in 'G' Block of the Bandra-Kurla Complex to the State Bank of India.

ITEM NO.10 : Allotment of Commercial Plot admeasuring 14000 Sq.Mtrs. in 'G' Block of Bandra-Kurla Complex to the Bharat Petroleum Corporation Limited - Offer to be kept in abeyance.

In connection with these items, the Chairman observed that taking into consideration the competing demand for land in Bandra-Kurla Complex, it was necessary at the present stage to decide whether to use the available land as financial centre or financial-cum-commercial centre and on the basis of the said decision to identify the types of financial/commercial organisations/institutions, trading activities, etc. to be allowed on that land. The Chairman, further suggested that the desirability of changing percentage of commercial use and the residential use in respect of remaining land in Bandra-Kurla Complex be also thought of. In case the residential component was reduced so as to increase the commercial component, the land in the No Development Zone in the vicinity could be converted into residential use. It was also suggested that introducing RORO service or similar facility be also thought of.

Accordingly, consideration of the Item Nos.8 and 9 was deferred and the suggestion to defer the allotment of land to Bharat Petroleum Corporation as suggested in Item No.10 was approved.

ITEM NO.11 : ...

ITEM NO.11 : Phase-II of the Wadala Truck Terminal - Assurance to be given to the Bombay Goods Transport Association (BGTA) and Maharashtra Truck Tempo Bus Vahatuk Sangh (MAHASANGH) about the allotment of the plots 50% each.

In connection with this Item, it was suggested that the details as regards membership of the Maharashtra Truck Tempo Bus Vahatuk Sangh (MAHASANGH) and of the Bombay Goods Transport Association (BGTA), role of the each organisation in the transport of goods in Greater Bombay, the space presently occupied by the members of these organisations at various places in the Island City, their intention as regards the use of the space presently with them after the Wadala Truck Terminal starts operating, etc. be ascertained from them and placed before the Authority.

Consideration of the Item was, accordingly, deferred.

ITEM NO.12 : Waiving of the interest charges on the balance amount of the channelisation charges to be paid by the Centre for the Study of Social Change (CSSC).

During the course of discussion on this item, the good work done by the Centre for the Study of Social Change (CSSC) for the poor was appreciated. The Authority was of the view that other institutions like CSSC who have been allotted land in the Bandra-Kurla Complex shall also be given facility of paying reduced channelisation charges in instalments and the interest charges be similarly waived. The Authority accordingly passed the following Resolution :-

RESOLUTION NO.574 :

"RESOLVED THAT the Authority hereby accords its sanction to waive the interest at 12½% per annum on the balance amount of the channelisation charges payable to the Authority by the Centre for the Study of Social Change in respect of the plot of land admeasuring 10670 Sq.Mtrs., in 'F' Block of Bandra-Kurla Complex allotted to that body by Government, as proposed.

"RESOLVED FURTHER THAT the Authority hereby accords its general sanction to allow the institutions working for the welfare of the poor, handicapped, etc. who have been

allotted.....

allotted land in the Bandra-Kurla Complex be given facility of payment of reduced channelisation charges in instalments and interest charges on account of delayed payment by such institutions be waived and the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to deal with such cases in future as per general sanction accorded by the Authority."

ITEM NO.13 : Accounts of the Authority for the year 1992-93 and report thereon.

In connection with this Item, the Secretary (I), Urban Development Department informed the meeting that the Accountant General, Maharashtra, statutory auditors of BMRDA, had observed that as the Government lands in the Bandra-Kurla Complex were transferred to BMRDA, the surpluses accrued to the BMRDA by disposal of these lands should revert to Government. It was clarified that Government lands under reference were unreclaimed and transferred to the BMRDA on payment of prescribed premium to Government and as per the terms and conditions of the said transfer the loss or profit due to sale or resale of developed plots shall be BMRDA's responsibility. It was also informed that the letter explaining the above position had already been sent to Government.

The Authority then approved the Annual Accounts and the Report of the Chief Accounts Officer & Financial Adviser thereon and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.575 :

"RESOLVED THAT the Authority hereby accords its approval to the Accounts of the Authority for the year 1992-93 and the Report of the Chief Accounts Officer and Financial Adviser thereon."

ITEM NO.14 : Annual Report of the BMRDA as Special Planning Authority for Kalyan Complex Notified Area for the year 1992-93.

The Authority approved the draft Annual Report and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.576 :

"RESOLVED THAT the Authority hereby (i) approves the draft report of the BMRDA as the Special Planning Authority

for .....

for Kalyan Complex Notified Area for the year 1992-93 and (ii) authorises the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

ITEM NO.15 : Annual Report by the BMRDA as the Special Planning Authority for Bandra Kurla Complex Notified Area for the year 1992-93.

During the course of discussion on this Item, a reference was made to one of the objectives of developing Bandra-Kurla Complex, viz. to exploit the opportunity of restructing the pattern of development by attracting large number of jobs from South Bombay as possible. It was conceded that even though the possible congestion in the city has been avoided by making available office space in the Bandra-Kurla Complex, it has not resulted in necessary relocation of existing jobs from South Bombay to the B.K.C. It was further stated that some ingenuous measures for achieving the desired goal of attracting the existing jobs from South Bombay to the B.K.C. be thought of and put into action at the time of future allotments.

The Authority then approved the draft Annual Report and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.577 :

"RESOLVED THAT the Authority hereby (i) approves the draft of the Annual Report for the year 1992-93 of the BMRDA as the Special Planning Authority for the Bandra-Kurla Complex Notified Area, as required under Section 133 of the MR&TP Act, 1966 and (ii) authorises the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

ITEM NO.16 : Annual Report of the BMRDA as the Special Planning Authority for Oshiware District Centre Area for the year 1992-93.

The Authority approved the draft Annual Report and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.578 :

"RESOLVED THAT the Authority hereby (i) approves the draft Annual Report of the BMRDA as the Special Planning Authority for Oshiware District Centre for the year 1992-93 and (ii) authorises the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

ITEM NO.17 : ....

ITEM NO.17 : Annual Report of the BMRDA as the Special Planning Authority for Backbay Reclamation Scheme (Blocks III to VI) for the year 1992-93.

The Authority approved the draft Annual Report and passed the following Resolution :-

RESOLUTION NO.579 :

"RESOLVED THAT the Authority hereby (i) approves the draft report of the BMRDA as the Special Planning Authority for Blocks III to VI of Backbay Reclamation Scheme for the year 1992-93 and (ii) authorises the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

The following Item was then considered as Table Item with the permission of the Chair :-

TABLE ITEM : Proposed redevelopment of MCGB's existing school in the commercial zone in 'H' Block of Bandra-Kurla Complex.

After discussion the Authority felt that as requested by the MCGB, minor modification to the sanctioned planning proposals of the Bandra-Kurla Complex be initiated under the provisions of MR&TP Act, 1966, so as to change the user of the plot under reference for school purpose. The Authority, accordingly, passed the following Resolution :-

RESOLUTION NO.580 :

"RESOLVED THAT the Authority being the Special Planning Authority for the Bandra-Kurla Complex Notified Area, appointed under Section 40(1)(c) of the MR&TP Act, 1966, in exercise of its powers under Section 40(3) of the Act read with Section 113(A)(8) jointly with Section 37 of the said Act and all other powers enabling it in this behalf, hereby approves that minor modification to the sanctioned planning proposals of the Bandra-Kurla Complex be initiated so as change reservation of a plot of land coming within the 100 mtr. wide strip of land along the Sion-Dharavi Road in 'H' Block of Bandra-Kurla Complex on which there exists a primary school of the Municipal Corporation of Greater Bombay from 'commercial' to 'school building'.

"RESOLVED .....

"RESOLVED FURTHER THAT the Authority in exercise of its powers under Section 37 of the said Act and other powers enabling it in this behalf hereby approves of a notice being published in the Maharashtra Government Gazette and in two local newspapers being The Times of India and the Loksatta for inviting objections and suggestions from the public with respect of such modification not later than one month from the date of such a notice.

"RESOLVED FURTHER THAT the Authority in exercise of its powers under Section 139 of the said Act read with Section 7(A) of the BMRDA Act, 1974 hereby authorises the Metropolitan Commissioner to publish the notice in accordance with the foregoing paragraph.

"RESOLVED FURTHER THAT the Authority in exercise of its powers under Section 151(3) of the said Act hereby directs that the Metropolitan Commissioner or the officer not below the rank of Senior Planner nominated by the Metropolitan Commissioner shall consider the objections/suggestions which may be received in this behalf and after giving hearing to persons presenting such objections/suggestions shall submit his report to the Authority alongwith proposed modification for being processed for final sanction in terms of Section 37 of the said Act."

The meeting then concluded with a vote of thanks to the Chair.

-.-.-.-.-.-.-.-.-.-.-

ANNEXURES I & II ...

ukd:080993:

ANNEXURE-I

ADJ.70TH MEETING OF THE B.M.R.D.A.

DATE : 24/08/1993.

RESOLUTION

"Shri Premkumar Sharma, M.L.A., has passed away on 1st June, 1993. Shri Sharma was member of the Authority being the Chairman, Standing Committee of the Municipal Corporation of Greater Bombay during the period from 10.04.1981 to 09.04.1982. The Authority wishes to place on record its deep sense of loss and sorrow at his sad and sudden demise."

-.-.-.-.-.-.-.-.-

Annexure-II ....

ANNEXURE-II

## RESOLUTION

"That the Bombay Metropolitan Region Development Authority places on record the valuable services rendered by Shri P. Subrahmanyam as Metropolitan Commissioner & Member-Secretary of the Authority during the period from 19.07.1991 to 21.07.1993. The Authority wishes Shri P. Subrahmanyam every success in his future assignments."

-.-.-.-.-.-.-